आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 25.11.2026 **वार : बुधवार**

ठळक बातम्या

1. राज्यातली भरती आणि स्पर्धा परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी राज्य शासनानं स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अनेक महत्त्वपूर्ण सूचना.
2. शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची निवड.
3. मुंबई पुस्तक महोत्सव संवेदनांचा आणि मानवतेचा महोत्सव ठरेल असा मुख्यमंत्र्यांचा विश्वास.
4. त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त राज्यात विविध मंदिरांमध्ये दीपोत्सव साजरा.
5. राज्य शासनाच्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पुढच्या महिन्यात पुण्यात मराठी चित्रपटांचा महोत्सव.

सविस्तर बातम्या

पेपरफूटी-तरतुदी

राज्यातली भरती आणि स्पर्धा परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्याच्या दृष्टीने राज्य शासनानं स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीनं अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा सुचवल्या आहेत. समितीनं पेपरफुटी, परीक्षांमधील गैरप्रकार आणि अनुचित साधनांचा वापर रोखण्यासाठी कठोर कायदेशीर तरतुदी करण्याची शिफारस केली आहे. तसंच परीक्षा संचालन, प्रशासकीय यंत्रणा, तंत्रज्ञानाचा वापर, सायबर सुरक्षा आणि उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीनंही समितीनं काही सुधारणा सुचवल्या आहेत.

संघटित गैरप्रकारांत सहभागी व्यक्ती आणि संस्थांना 7 ते 10 वर्षांचा कारावास, किमान 10 कोटी रुपये दंड, नुकसानभरपाईची वसुली आणि मालमत्ता जप्ती अशा शिक्षा समितीनं सुचवल्या आहेत. याबाबतचा ठराव राज्य विधीमंडळाच्या येत्या हिवाळी अधिवेशनात मांडला जाईल असं सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले...

परीक्षा पद्धती ही कशी आपल्याला पारदर्शी करता येईल. त्याकरता काय व्यवस्था उभ्या करायच्या, व्हेन्यूज कसे तयार करायचे परीक्षेचं शुल्क हे त्यांनी शिफारस केली आहे, की सिरियसनेस राहावा म्हणून शुल्क भरावं लागलं पाहिजे. पण परीक्षा दिल्यानंतर ते शुल्क परत केलं पाहिजे कोणावरही त्याचं बर्डन येऊ नये, या दृष्टीने त्यांनी शिफारस केलेली आहे. आमचा प्रयत्न असेल की याच अधिवेशनामध्ये हा कायदा जर आम्हाला आणता आला तर याच अधिवेशनामध्ये हा कायदा आणून आम्ही तो कायदा मंजूर करू.

ड्रॅगन पॅलेस टेंपल

नागपूरची पवित्र दीक्षाभूमी आणि कामठी इथल्या 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल' मुळे शहराला जागतिक स्तरावर बौद्ध धम्माचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून ओळख मिळत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या 27व्या वर्धापन दिन सोहळ्याचं उद्घाटन काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

भगवान गौतम बुद्धांनी जगाला प्रज्ञा, करुणा आणि शील याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांवर आधारित बौद्ध धम्म आज जगभर पोहोचला असून, जपानसह अनेक देशांमध्ये बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या संख्येने आहेत. भारत आणि जपान यांच्यात राजकीय संबंधांसोबतच दृढ सांस्कृतिक आणि वैचारिक नातंदेखील आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी ओगावा सोसायटीच्या अध्यक्षा ॲड. सुलेखा कुंभारे यांच्यासह जपानमधल्या बौद्ध भिक्षू संघाचे प्रतिनिधी आणि विविध मान्यवर उपस्थित होते.

साहित्य संमेलन

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी काल पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली, ते म्हणाले...

सरस्वती सन्मान प्राप्त डॉ. शरण कुमार लिंबाळे यांनी आजपर्यंत जवळजवळ 46 ग्रंथांचे लेखन केले. ते 1982पासून त्यांच्या लेखनाला सुरुवात झाली. त्यातील महत्त्वाचे 'अक्करमाशी', 'राणीमाशी' हे सगळे ग्रंथ आपण जाणतोच. त्याबरोबरीने अन्य भाषांमध्ये सगळ्यात जास्त साहित्य त्यांचं विशेषतः मल्याळममध्ये, कन्नडामध्ये हे अनुवादित झालेलं आहे. अशा डॉ. शरण कुमार लिंबाळे यांची अत्यंत सन्मानपूर्वक एकमताने निवड झालेली आहे.

'अक्करमाशी' हे आत्मकथन तसंच 'हिंदू', 'बहुजन' आणि 'सनातन' या कादंबऱ्या हे डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचं गाजलेलं साहित्य. 'सनातन'साठी त्यांना सरस्वती सन्मानानं गौरवण्यात आलं आहे. अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणाले...

हा माझ्या लेखनाचा आणि मराठी भाषेसाठी मी जे काम केलेलं आहे, गेली चाळीस पंचेचाळीस वर्षं, त्या सेवेचा सन्मान आहे. आज भारतामध्ये मराठी भाषेची चर्चा होते, मराठी साहित्याची चर्चा होते. मराठीतलं साहित्य अतिशय वैभवशाली साहित्य आहे आणि मराठी भाषा अभिजात अशी भाषा आहे. संतांपासून ते दलित लेखकांपर्यंत ही साहित्यनिर्मिती झालेली भाषा आहे. आणि या भाषेला फार मोठा उज्वल भवितव्य आहे. मला या माय मराठीनं, मराठी माणसानं, शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची मान माझ्या गळ्यात घातलेली आहे. या मराठी समाजाविषयी कृतज्ञ आहे.

डॉ. लिंबाळे यांच्या अध्यक्षतेखाली होणारं शतक महोत्सवी साहित्य संमेलन मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या वाटचालीतील एक संस्मरणीय पर्व ठरेल, अशा शब्दांत मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी लिंबाळे यांना शुभेच्छा दिल्या.

पुस्तक महोत्सव

भारतीय परंपरेत ग्रंथांचं महत्त्व अनन्यसाधारण असून पुस्तकं आणि ग्रंथांमध्ये समाज घडवण्याची अभूतपूर्व ताकद असते असं सांगून मुंबई पुस्तक महोत्सव संवेदनांचा आणि मानवतेचा महोत्सव ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या महोत्सवाचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झालं त्यावेळी ते बोलत होते. मुंबई विद्यापीठ परिसरात केंद्रीय शिक्षण मंत्रालय, नॅशनल बुक ट्रस्ट, राज्य शासन, मुंबई विद्यापीठ आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी हा पुस्तक महोत्सव आयोजित केला आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला मंत्री आशिष शेलार, मंगल प्रभात लोढा यांच्यासह अनेक अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. या महोत्सवात 600हून अधिक पुस्तकांची दालनं असून 200हून अधिक साहित्यिक सत्रं होणार आहेत. हा पुस्तक महोत्सव आता मुंबईत दरवर्षी आयोजित केला जाणार आहे.

त्रिपुरी पौर्णिमा

त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त काल राज्यात अनेक मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रम, अन्नकोट आणि दीपोत्सव आयोजित करण्यात आला होता. पुण्यात पर्वतीवरचे कार्तिकस्वामी मंदिर तसंच ओंकारेश्वर आणि इतर शिवमंदिरांमध्ये दीपोत्सवाच्या माध्यमातून उत्सवी वातावरण पाहायला मिळालं.

कोल्हापुरातील पंचगंगा नदी घाट 51 हजार दिव्यांनी उजळले होते. वर्षातून एकदा भाविकांसाठी खुलं केल्या जाणाऱ्या कार्तिक स्वामी मंदीरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. बीड शहराचं ग्रामदैवत असलेल्या कनकालेश्वर मंदिरात भव्य दीपोत्सव आणि महाआरतीचं आयोजन करण्यात आलं होतं. बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र कपिलधार इथल्या यात्रेत राज्यासह कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील हजारो भाविक सहभागी झाले होते. नांदेडमध्ये महाप्रसाद, आरोग्य तपासणी, औषधोपचार, रक्तदान आणि स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. तर जालना जिल्ह्यात अंबड इथल्या श्री मत्स्योदरी देवी मंदिरात 11,000 दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

श्री गुरुनानकजी जयंती

शीख धर्माचे संस्थापक श्री गुरु नानक देवजी यांची 557वी जयंती काल सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली.

पुणे चित्रपट महोत्सव

राज्य शासनाच्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त येत्या 6 ते 9 डिसेंबर दरम्यान पुण्यात मराठी चित्रपटांचा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये राज्य शासनाचा 'संत तुकाराम' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार मिळवलेले 17 चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट मराठी दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळालेले 3 चित्रपट प्रेक्षकांना पाहता येतील. पुण्यातल्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात होणाऱ्या या महोत्सवात प्रत्येक चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळेस चित्रपटाचे दिग्दर्शक आणि कलाकार प्रेक्षकांशी संवाद साधतील.

डिजिटल ऑडिओ गाईड

सोलापूरच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यासह राज्यातील सुमारे 40 किल्ल्यांची सविस्तर माहिती आता एका क्लिकवर आणि ऑडिओ स्वरूपात ऐकायला मिळणार आहे. जागतिक वारसा सप्ताहानिमित्त भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई मंडळाच्या वतीनं काल सोलापूरच्या भुईकोट किल्ल्यावर या 'डिजिटल ऑडिओ गाईड' सुविधेचा शुभारंभ करण्यात आला.

धाराशिव-वृक्ष संवर्धन

सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापरातून धाराशिवमध्ये 10,000 वृक्षांचं संवर्धन आणि उद्यान विकसित केलं जाणार आहे. कमी जागेत आणि कमी खर्चात उभारता येणाऱ्या 'मॉड्युलर एसटीपी' तंत्रज्ञानाचा यासाठी वापर केला जाणार आहे.

आर्चरी एशिया कप

चीनमध्ये झालेल्या 'आर्चरी एशिया कप' वर्ल्ड रँकिंग टूर्नामेंटच्या स्टेज-3 स्पर्धेत अमरावतीच्या मानव जाधव यानं पुरुषांच्या कंपाउंड सांघिक गटात रौप्यपदक, तर अभ्युदय अमोल पखाले यानं पुरुषांच्या रिकर्व्ह सांघिक गटात कांस्यपदक पटकावलं.

हवामान

संपूर्ण राज्यात काल हवामान कोरडं होतं. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. आजही बहुतांश ठिकाणी हवामान कोरडे राहण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.